वेबसाईट अपलोड तारीख / /

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

# सहकारी संस्थांसाठी स्वमालकीच्या कार्यालयीन जागेच्या तारणावरील मुदत कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

प्रधान कार्यालय : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट
मुंबई - ४०० ००१

## सहकारी संस्थांसाठी स्वमालकीच्या कार्यालयीन जागेच्या तारणावरील मुदत कर्ज धोरण

**(४२/३ री संचालक मंडळ सभा दिनांक ०४/०६/२०१६ चे ठराव क्रमांक ४ नुसार मंजूर झालेले)**

**(दिनांक ०६/०६/२०१६ पासून लागू )**

सहकारी संस्थांसाठी स्वमालकीचे, कार्यालयीन जागेच्या तारणावर, मंजूर करावयाचे मुदत कर्ज / क्लिन कॅश क्रेडिट कर्ज धोरण खालिल प्रमाणे राहील.

**कर्जदार संस्थांसाठी पात्रता निकष**

१) बँकेची सभासद असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था कर्ज मंजुरीस पात्र राहतील.

२) "अ" किंवा "ब" शासकीय लेखा परिक्षण वर्गातील संस्था सदर कर्ज मंजूरीस पात्र राहतील.

३) नव्याने स्थापन झालेल्या संस्थांचे बाबतीत नोंदणीनंतर प्रत्यक्षात कार्यान्वित होऊन, ३ वर्षे पुर्ण होऊन संस्थेचे शासकीय लेखापरिक्षण झाल्यानंतर अशा संस्था कर्ज मंजूरीस पात्र होतील.

४) नागरी सहकारी पतसंस्था तसेच पगारदार नागरी सहकारी संस्थांना मासिक परतफेडीचे (हप्तेबंदी) मुदत कर्ज मंजूर करण्यात येईल व या व्यतिरिक्त प्रकारच्या संस्थांना क्लिन कॅश क्रेडिट कर्ज सुविधा मंजूर केली जाईल.

५) ज्या संस्थेने बँकेचे मुदत कर्ज किंवा कॅश क्रेडिट कर्ज सुविधा घेतली असेल व ती चालू असेल अशा कर्जाची येणेबाकी संस्थेची बाहेरुन कर्ज उभारणेची मर्यादा आजमिवताना एकूण मर्यादेतून वजा केली जाईल.

६) नागरी सहकारी पतसंस्थांसाठी कर्ज मागणी अर्ज सादर करतेवेळी संस्था पातळीवर सभासद कर्ज थकबाकीचे, कर्ज येणेबाकीशी शेकडा प्रमाण २०% पेक्षा जास्त असणाऱ्या संस्था सदरील बँक कर्जास पात्र होणार नाहीत. पगारदार संस्थांसाठी सदर प्रमाण १०% इतके राहील.

७) मागील लगतचे आर्थिक वर्षाअखेर नफ्यात असणारी व लाभांश वाटप करणारी संस्था तारण कर्ज मंजूरीस पात्र राहील.

८) संस्थेने उपविधीतील तरतूदीनुसार संचालक मंडळाची निवड झालेल्या संस्था कर्ज मंजूरीस पात्र रहातील

९) संचालक मंडळातील संचालक सदस्य स्वतःच्या व इतर सहकारी संस्थेत थकबाकीदार असल्यास संस्था कर्जमंजुरीस पात्र रहाणार नाही.

१०) संस्थांचे कार्यक्षेत्रातील स्वमालकीच्या कार्यालयीन, स्थावर मालमत्ताच, सदर कर्जासाठी ग्राहय धरल्या जातील.

११) सदरील कर्ज मंजुरीचे वेळी संस्थेची बाहेरुन कर्ज उभारणेची मर्यादा विचारात घेतली जाईल.

**कर्जमागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१) कर्ज मागणी अर्ज (बँकेच्या विहीत नमुन्यातील)

२) नोंदणी प्रमाणपत्र व उपविधी (अद्यावत दुरुस्ती ज्ञापन प्रपत्रासह) सत्यप्रत.

३) गतवर्षीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व संस्थेने सादर केलेल्या दोष दुरुस्ती अहवालाची सत्यप्रत.

४) मागील ३ वर्षाचे वार्षिक अहवाल.

५) संस्थेची मागील महिन्याची आर्थिक पत्रके (तेरीज, नफातोटा, ताळेबंद).

६) बँक कर्ज मागणीबाबत संस्थेच्या कार्यकारी मंडळ सभेच्या ठरावाची सत्यप्रत तसेच कर्ज मागणी अर्जावर व सादर करावयाचे इतर कागदपत्रावर सहया करणेसंबंधी अधिकार दिलेल्या ठरावाची सत्यप्रत (उपविधी नुसार)

७) कार्यकारी मंडळ सदस्यांची नावे, पत्ते, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक व कर्जदार असल्यास कर्जाची माहिती.

८) संपूर्ण वर्षाची मासिक कर्ज वाटप व वसुलीची माहिती (पगारदार व नागरी पतसंस्थांसाठी लागू).

९) दिर्घ मुदत कर्जाची पगारातून येणारी वसुली (मुद्दल, व्याज व इतर कपाती सह) माहिती पत्रक (पगारदार संस्थांसाठी)

१०) सभासद कर्ज येणेबाकीची थकबाकी सह यादी (पगारदार व नागरी पतसंस्थांसाठी).

११) कार्यालयीन स्वमालकीचे, स्थावर मालमत्तां संबंधीची संपूर्ण कागदपत्रे (चैन ॲग्रीमेंन्ट, खरेदीखत, शेअर सर्टिफिकेट, मुल्यांकन अहवाल, इत्यादी)

१२) ग्राहक, मजूर, महिला संस्था, औद्योगिक संस्था यांचेसाठी अद्यावत साठामाल पत्रके, येणेबिले सादर करणे आवश्यक राहील.

**कर्ज मंजूरी मर्यादा :-**

संस्थेच्या स्वमालकीचे स्थावर मालमत्तेचे (सरकारी बाजार भावानुसारचे) मुल्याचे ७५% किंवा कमाल रू.५.०० कोटी इतकी मुदत कर्ज किंवा क्लिन कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा मंजूर केली जाईल.

**कर्जाचा कालावधी :-** मुदत कर्जासाठीचा कालावधी - कमाल ८४ समान मासिक परतफेड हप्ते इतका

राहील.

क्लिन कॅश क्रेडिट कर्जासाठी - १ वर्ष (१२ महिने) इतका असेल.

प्रतिवर्षी नुतनीकरण करणे आवश्यक राहील.

**व्याजदर :-** द.सा.द.शे.१२% (प्रचलित, मॉर्गेज कर्ज व्याजदरानुसार) इतका राहील.

**कर्ज मागणी, मंजूरी, व उचल प्रक्रिया :- १) मुदत कर्जाचे बाबतीत** बँकेच्या प्रचलित नागरी पतसंस्था व पगारदार संस्थांचे मुदत कर्ज धोरणानुसार राहील.
**कर्ज वितरण प्रक्रिया व दस्तऐवज**

**२) क्लिन कॅश क्रेडिट कर्जाचे बाबतीत** प्रचलित धोरणानुसार राहील.

**अटी :-**

**अटी :-**

१) संस्थेने कर्जास तारण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचे बँकेच्या नावे इक्वीटेबल मॉर्गेज करुन त्याची नोंदणी, ई-फायलिंग पध्दती अंतर्गत, करणे आवश्यक राहील. तसेच संबंधित गृहनिर्माण संस्थेचा ना हरकत दाखला सादर करुन तारणावर बँक कर्जाचा बोजा नोंदविणे आवश्यक राहील. तारण जागेचे मुल्यांकन, लिगल, व मॉर्गेजसंबंधीचा खर्च संस्थेस सोसावा लागेल.

२) मंजूर बँक कर्जाचा विनियोग, संस्थेच्या उपविधीतील उद्देशांशिवाय (उदा.नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी संस्थांसाठी सभासद कर्ज वाटपाकरीता) व (अन्य संस्थांसाठी खेळत्या भांडवलाकरीता) अन्य कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही.

३) मंजूर बँक कर्जातून संस्थेने केलेल्या विनियोगा संबंधीची पुरावा दर्शक कागदपत्रे दरमहा शाखेस सादर करणे आवश्यक राहील.

४) नागरी पतसंस्थांना मंजूर कर्जातून ८०% तारणी कर्ज वाटप करणे आवश्यक राहील तसेच सदर कर्जातून वाटप करावयाचे सभासद कर्ज रोखे तपासणी करीता शाखेस सादर करणे आवश्यक राहील व असे कर्ज रोखे संस्थेच्या मुदत कर्ज किंवा कॅश क्रेडिट कर्जास पात्र होणार नाहीत.

५) कर्ज मंजूर तारखेपासुन २ महिन्याचे आत कर्ज उचलीचे ठरावासह दस्तऐवज शाखेस सादर करणे आवश्यक राहील अन्यथा कर्ज मंजूरी आपोआप रद्यबतल होईल.

६) संस्थेने दरमहाची आर्थिक पत्रके (उदा.ताळेबंद नफातोटा पत्रक) सभासद कर्ज येणेबाकी, थकबाकी यादी व N.O.D.C दाखल (पगारदार सहकारी संस्थांना लागू) शाखेस सादर करणे आवश्यक राहील. तसेच अन्य संस्थांनी दरमहा ताळेबंद, नफातोटा पत्र, साठामाल पत्रक सादर करणे आवश्यक राहील.

७) नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी संस्थांसाठी उपरोक्त कर्ज मागणी, कर्ज वितरण, दस्तऐवज प्रक्रिया व इतर अटी, बँकेच्या प्रचलित संस्था मुदत कर्ज धोरणानुसार तसेच अन्य संस्थांसाठी क्लिन कॅश क्रेडिट कर्जाच प्रचलित धोरणाप्रमाणे लागू राहतील.